# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati@dtemaharashtra.gov.in Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


क्रमांक :- विकाअ/शिक्षण/प्रवेश/२०१९/ 836

दिनांक :- 29 MAR 2019

**प्रति,**

**प्राचार्य,**

सर्व शासकीय/शासन अनुदानित/विद्यापिठ विभाग/विद्यापिठ संचालीत
व स्वायत्त संस्थेतील पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा-या संस्थांचे शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेकरीता नोंदणी प्रक्रियेबाबत.**

**संदर्भ :-** मा.संचालक, तंशिस., म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- २अ/एडीएम/२०१९/२६३ दि. २८ मार्च २०१९.

**महोदय,**

उपरोक्त विषयाबाबत आपणास सादर करण्यात येते की, सोबत तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र व त्यासोबत हमीपत्राचा नमुना जोडलेला आहे. कृपया त्याचे अवलोकन करावे.

तेव्हा याबाबत आपणास कळविण्यात येते की, पत्रासोबत जोडलेल्या नमुन्यात प्राचार्य/संचालकांनी द्यावयाचे हमीपत्र न चुकता **दिनांक ३/४/२०१९** पर्यंत या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. तरी संबंधीत संस्थानी सोबत जोडलेल्या संदर्भिय पत्राचें अवलोकन करावे व दिलेल्या कालावधीत हमीपत्र सादर करावे याची संबंधित संस्थांनी नोंद घ्यावी.

सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : desk2a@dtemaharashtra.org.in Internet :http/www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक : २अ/एडीएम/२०१९/२६३

दिनांक : 28 MAR 2019

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/ पुणे /नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर

विषय : व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांचे शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेकरीता नोंदणी प्रक्रियेबाबत..

संदर्भ : प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि.२०/०२/२०१९ रोजी आयोजित केलेल्या बैठकीचे इतिवृत्तातील मुद्दा क्र.७

महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ नुसार राज्यातील खाजगी व्यावसायिक संस्थेतील तांत्रिक अभ्यासक्रमांचे प्रवेश शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्यामार्फत करण्यात येत आहेत. तसेच शासकीय व शासन अनुदानीत व्यावसायिक शैक्षणिक संस्थामधील प्रवेश देखील शासन निर्णय क्र.टिईएम-२०१६/प्र.क्र.५३६/तांशि-४, दि.१५/०३/२०१६ अन्वये शासन निर्णयात नमूद तरतूदीनुसार मा.आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत करण्याचे घोषित केलेले आहे. त्यानुसार राज्यातील सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया मा.आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत एक खिडकी पध्दतीने राबविण्यात येत आहे.

वरील बाब विचारात घेऊन प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्या कार्यालयात दि.२०/०२/२०१९ रोजी झालेल्या बैठकीत शै.वर्ष २०१९-२० मध्ये सर्व शासकीय व शासन अनुदानित संस्थेतील पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया राबवितांना शासनाने वेळोवेळी प्रसिध्द केलेले नियम त्यांना मान्य राहतील याबाबतचे हमीपत्र मा.सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांना सादर करणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

तरी वरील बाब विचारात घेऊन आपल्या विभागातील पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या सर्व शासकीय/ शासन अनुदानित / विद्यापीठ विभाग/ विद्यापीठ संचलित /स्वायत्त संस्थाकडून सोबत जोडलेल्या नमुन्यात हमीपत्र घेण्यात यावे व संकलीत करून एकत्रितरित्या या कार्यालयास दि.०५/०४/२०१९ पर्यंत सादर करण्यात यावे.

(डॉ.अभय वाघ)

संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई

C:\Users\desk2a\Desktop\Letter 2018-19.docx

सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती

आवक क्र. 1437 दिनांक 28/3/19

## शासकीय/ शासन अनुदानित / विद्यापीठ विभाग/ विद्यापीठ संचलित/ स्वायत्त संस्थांच्या प्राचार्य/ संचालकांनी दयावयाचे हमीपत्र

मी ............................................... प्राचार्य / संचालक, (संस्थेचे नांव व कोड) या संस्थेचा व संस्थेतील अभ्यासक्रमांचा शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश करण्याबाबत खालीलप्रमाणे हमीपत्र सादर करीत आहे.

महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील तरतुदी व प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या व भविष्यात निर्गमित होणाऱ्या शासन निर्णयातील सर्व नियमांचे व सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल. मा.आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता राबविण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रिये संदर्भात (संस्थेतील प्रवेशाच्या अनुषंगाने) त्यांचेकडून देण्यात येणाऱ्या सर्व सूचनांचे पालन या कार्यालयाकडून केले जाईल याची मी संस्थेच्यावतीने हमी देतो.

प्राचार्य/ संचालक
(नांव व संस्थेचे सील)

ठिकाण :
दिनांक :

\\192.168.1.9\Desk2a\Hamipatra.doc